. Shri Vile Parle Kelavani Mandal's
NARSEE MONJEE COLLEGE OF COMMERCE AND ECONOMICS
(AUTONOMOUS)
Vile Parle (West), Mumbai-400 056

22nd May 2024.

**NOTICE**

## Junior College

### VERIFICATION, REVALUATION & PHOTOCOPY OF H.S.C. EXAMINATION MARCH-2024.

Students, who wish to apply for verification, revaluation & photocopy of answer books of the H.S.C. Examination February/March 2024 can visit online website http://verification.mh-hsc.ac.in.

**Payment of Fees :**

| | | |
|---|---|---|
| Fees for Photocopy (can apply from 22.05.2024 to 05.06.2024) | : | @ Rs. 400/- Per subject |
| Fees for Revaluation | : | @ Rs. 300/- Per subject |
| Fees for verification (can apply from 22.05.2024 to 05.06.2024) | : | @ Rs. 50/- Per subject |

Students who wish to appear for re-exam or class improvement in July/August 2024 can apply for the same from Monday 27.05.2024 through the college. The circular regarding the filling of application forms will be displayed on Maharashtra State Board's website.

**Note : Payment can be made through Debit Card/Credit Card/UPI /Net Banking**

Mrs. Bhavana Menon
Vice Principal

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

# प्रकटन

**विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या निकालाबाबत**

मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा निकाल खालील अधिकृत संकेतस्थळांवर मंगळवार दिनांक २१/०५/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे. अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. mahresult.nic.in
२. http://hscresult.mkcl.org
३. www.mahahsscboard.in
४. https://results.digilocker.gov.in
५. www.tv9marathi.com
६. http://results.targetpublications.org

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवरुन उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आउट) घेता येईल. त्याचप्रमाणे Digilocker app मध्ये Digital गुणपत्रिका संग्रहीत करून ठेवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

www.mahresult.nic.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालासोबत निकालाबाबतची इतर सांख्यिकीय माहिती उपलब्ध होईल.

तसेच www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

## सदर निकालाबाबतचा अन्य तपशील पुढीलप्रमाणे-

१) ऑनलाईन निकालानंतर उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन (http://verification.mh-hsc.ac.in) स्वत: किंवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. गुणपडताळणीसाठी व उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी बुधवार, दिनांक २२/०५/२०२४ ते बुधवार, दिनांक ०५/०६/२०२४ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल. त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking याद्वारे भरता येईल.

२) फेब्रुवारी–मार्च २०२४ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३) फेब्रुवारी–मार्च २०२४ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेत सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या **विद्यार्थ्यांसाठी** लगतच्या दोनच संधी (जुलै–ऑगस्ट २०२४ व फेब्रुवारी–मार्च २०२५) श्रेणी/गुणसुधार (**Class Improvement Scheme**) योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

४) जुलै–ऑगस्ट २०२४ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी व श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी सोमवार दिनांक २७/०५/२०२४ पासून मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरुन घेण्यात येणार आहेत. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे.

दिनांकः २०/०५/२०२४

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे–०४

क्र.पु.वि.मं./शाखा-'अ'/2729
पुणे-४११००५
दि.२०/०५/२०२४

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय / शाळा
जिल्हा-पुणे /अहमदनगर /सोलापूर.

उपरोक्त राज्यमंडळाच्या प्रकटनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांनी व शाळांनी आपल्या सूचना फलकावर लावून विद्यार्थी व पालकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

( औदुंबर उकिरडे )
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,पुणे

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

## मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई ४००७०३

## उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकना बाबतचा अभिप्राय

### माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२४

विषयः ---------- दिनांकः- / /२०२४

मी शिक्षकाचे पूर्ण नांव-------------- शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात-------- -यां पदावर कार्यरत असून इ.१०वी/इ.१२वी ला --------- हा विषय शिकवित आहे.

अर्जदार विद्यार्थी हा आमच्या शाळेतील/ कनिष्ठ महाविद्यालयातील असून तो माध्यमिक/उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२४-------- प्रविष्ठ झाला होता. सदर विद्यार्थ्यांने मंडळाकडून उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत घेतल्यानंतर पुनर्मुल्यांकन करण्याबाबतचा अर्ज केलेला आहे. त्यानुसार सदर विद्यार्थ्याचे उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीची मी नमूना उत्तरांच्या आधारे पुनश्चः तपासणी केलेली असून मला खालील प्रश्नात कमी गुणदान झाल्याचे आढळून येते/गुणदान योग्य झाल्याचे आढळून येते. गुणदान कमी झाल्याबाबत मी खालीलप्रमाणे सकारण अभिप्राय देत आहे.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

शिक्षकाची स्वाक्षरी

मुख्याध्यापकाची स्वाक्षरी
शाळा/महाविद्यालयाचा शिक्का

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) फेब्रु/मार्च २०२४ परीक्षेच्या गुणपडताळणीसाठी व उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी (Verification of Marks Answerbook Xerox) बुधवार दिनांक २२/५/२०२४ ते बुधवार दिनांक ०५/०६/२०२४ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करता येईल. त्यासोबत ऑनलाईन पध्दतीने शुल्क (Debit card/credit card/UPI/Net Banking ) याद्वारे भरता येईल. मंडळाची वेबसाईट खालील प्रमाणे.

# http://verification.mh-hsc.ac.in

ऑनलाईन अर्ज केल्यापासून कार्यालयीन १५ दिवसानंतर वरील लिंकवर केस नंबर प्रमाणे छायांकित प्रतीच्या अर्जाचे Status Check करण्यात यावे. वरील पोर्टलवर सदरील प्रत डाऊनलोड करून घ्यावी.

## उत्तरपत्रिकांची झेरॉक्स मिळण्यासाठी करावयाची कार्यपध्दती खालील प्रमाणे

1) http://verification.mh-hsc.ac.in या वेबसाईटवर Login करणे.

2) Check application status येथे Click करणे.

3) Seat no.

   Mothers Name

   Submit

4) Status Check येथे अंतिम रकान्यात Download असा messege असेल तेथे PDF ANSWER BOOK DOWNLOAD करण्यात यावे.

# MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,PUNE.

Official website for HSC Verification of Marks/Photocopy of Answer Book/Revaluation of Answer Book/Migration Certificate

उत्तरपत्रिका गुणपडताळणी
VERIFICATION OF MARKS

उत्तरपत्रिका छायाप्रत
PHOTOCOPY OF ANSWER BOOK

उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन
REVALUATION OF ANSWER BOOK

तांत्रिक अडचणी साठी संपर्क
020-25705207,08
support@msbshse.ac.in

## सूचना/Instructions

### उत्तरपत्रिका गुणपडताळणीसाठी (Verification of Marks) अटी/ शर्ती व सूचना :

विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक सूचना, सूचना क्रमांक १२ पासून.

1) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास त्या परीक्षेतील स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त ) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची पडताळणी करण्यासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून (website) स्वतः किंवा शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करता येईल. ज्या विषयांसाठी गुणपडताळणी करणे आवश्यक आहे ते सर्व विषय एकाचवेळी ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. एकदा अर्ज केल्यानंतर पुन्हा अर्ज करता येणार नाही.

2) ऑनलाईन अर्ज मंडळाच्या संकेतस्थळावरील विहित नमुन्यात प्रत्येक परीक्षेच्या वेळी ऑनलाईन निकाल जाहीर केल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक प्रत्येक परीक्षेच्या निकालाच्या दिवशी जाहीर करण्यात येईल.

3) गुणपडताळणीसाठी प्रती विषयास रु. ५०/- इतके शुल्क ऑनलाईन पद्धतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking ) भरता येईल.

4) गुणपडताळणीसाठी ऑनलाईन अर्जातील सर्व माहिती भरणे अनिवार्य असेल . अपूर्ण माहिती भरलेले अर्ज, कमी शुल्क भरलेले , शुल्क न भरलेले व मुदतीनंतर प्राप्त झालेले ऑनलाईन अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

5) गुणपडताळणी नंतर गुणात बदल झाल्यास सदरचा बदल विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील. त्यानुसार गुणपडताळणीनंतर संबंधित विद्यार्थ्याची मूळ संपादणूक आपोआप रद्द होईल व गुण कमी झाले तरी सुधारित संपादणूक स्विकारणे विद्यार्थ्यास बंधनकारक राहील.

6) सवलतीचे गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याने सवलतीचे गुण मिळालेल्या विषयाच्या गुणपडताळणीसाठी अर्ज केला असेल व गुण पडताळणीत विद्यार्थ्याचे अशा विषयातील गुण कमी झाल्याने तो सवलतीच्या गुणासाठी अपात्र ठरत असेल तर अशा प्रकरणी विद्यार्थ्याच्या उत्तीर्ण निकालात बदल करण्यात येईल व तो स्विकारणे बंधनकारक असेल.

7)-उत्तीर्ण होऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी च्या निकालाची वाट न पाहता पुढील परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी विहित मुदतीत परीक्षेचे आवेदनपत्र संबंधित विभागीय मंडळाकडे माध्यमिक /उच्च माध्यमिक शाळेमार्फत / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सादर करणे आवश्यक आहे. निर्धारित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत पुढील परीक्षेचे आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.

8) गुणपडताळणीमधील गुण वाढीमुळे विद्यार्थी सवलतीचे गुण मिळण्यास पात्र ठरत असल्यास त्यास ते गुण देय असतील.

9) गुणात बदल नसलेल्या विद्यार्थ्याचे गुणपडताळणी शुल्क परत केले जाणार नाही मात्र गुणात बदल झालेल्या प्रकरणी विद्यार्थ्याने भरलेले शुल्क परत दिले जाईल.

10) उत्तीर्ण विद्यार्थ्यांना गुणपडताळणीअंती पाठविण्यात येणाऱ्या ' नो चेंज' (No change) या निर्णयाचा अर्थ गुणपडताळणीत कोणताही बदल न होणे व उत्तीर्ण होऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना गुणपडताळणीअंती पाठविण्यात येणाऱ्या ' नो चेंज' (No change) या निर्णयाचा अर्थ गुणपडताळणीनंतर गुणात कोणताही बदल न होणे किंवा गुणात पाच टक्क्यांहून कमी गुणांचा बदल झाल्यामुळे उत्तीर्ण होऊ न शकलेल्या विषयाच्या निकालात व एकूण निकालात कोणताही बदल न होणे असा असेल.

11) गुणपडताळणीमध्ये विद्यार्थ्याच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधित विद्यार्थ्यास व संबंधित माध्यमिक शाळेस / उच्च माध्यमिक शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास कळविण्यात येईल.त्यानुसार विद्यार्थ्याचे मूळ गुणपत्रक विभागीय मंडळाकडे जमा केल्यानंतर त्यास सुधारित गुणपत्रक देण्यात येईल.

12) उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन/ यासाठी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी http://verification.mh-ssc.ac.in व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरून आलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील

13) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेनंतरच्या स्थलांतर पप्रमाणपत्रासाठी http://verification.mh-ssc.ac.in व इ. ११ वी तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेनंतरच्या प्रमाणपत्रासाठी http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरून आलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील

14) विध्यार्थ्यांने उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन/स्थलांतर प्रमाणपत्र यासाठी करावयाच्या ऑनलाईन भरावयाची माहिती बिनचूक भरावी. अर्ज प्रणालीमध्ये SUBMIT केल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही

15) ऑनलाईन. प्रणालीमध्ये विद्यार्थ्यास उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/ पुनर्मूल्यांकन/स्थलांतर प्रमाणपत्र या प्रत्येक बाबीसाठी फक्त एकदाच अर्ज करता येईल. त्यामुळे अर्ज भरण्यापूर्वी विषयाची संख्या निश्चित करूनच अर्ज भरण्याची कार्यवाही करावी .कोणत्याही परिस्थितीत दुबार अर्ज स्विकारले जाणार नाहीत

16) उत्तरपत्रिका पुनर्मूल्यांकन करण्याकरिता अर्ज करतांना विषय शिक्षकांचा अभिप्राय PDF File स्वरूपात (File Size १५ MB पर्यंत) अपलोड करणे अनिवार्य आहे तसेच सदर अभिप्राय सुस्पष्ट असणे आवश्यक आहे

17) विध्यार्थ्यांनी तांत्रिक बाबीसंदर्भात अडचणी/शंका असल्यास (support@msbshse.ac.in) या ई-मेल आयडी वर अथवा ०२०-२५७०५२०७,२५७०५२०८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

18) ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भात व्हिडीओ पाहण्यासाठी विध्यार्थ्यांनी HELP या पर्यायाची निवड करावी. उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन/ स्थलांतर प्रमाणपत्र या चारही प्रकारासाठी स्वतंत्र व्हिडीओ देण्यात आलेले आहेत

19) विद्यार्थ्यांने ऑनलाईन प्रकीयेद्वारे केलेल्या अर्जाची सद्यस्थिती (status) संकेतस्थळावर पाहता येईल.आपल्या अर्जावरील प्रकिया पूर्ण झाल्यानंतरच आवश्यकता भासल्यास संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

©Maharashtra State Board Pune. All Rights Reserved.
Bhamburda, Shivajinagar, Agarkar marg, Shivajinagar Pune 411005(M.S.)

०२०-२५७०५२०७,२५७०५२०८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,PUNE.

Official website for HSC Verification of Marks/Photocopy of Answer Book/Revaluation of Answer Book/Migration Certificate

उत्तरपत्रिका गुणपडताळणी
VERIFICATION OF MARKS

उत्तरपत्रिका छायाप्रत
PHOTOCOPY OF ANSWER BOOK

उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन
REVALUATION OF ANSWER BOOK

तांत्रिक अडचणी साठी संपर्क
020-25705207,08
support@msbshse.ac.in

## सूचना/Instructions

### उत्तरपत्रिका छायाप्रत (Photocopy of Answer book) मिळण्यासाठी अटी / शर्ती व सूचना:

विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक सूचना, सूचना क्रमांक १३ पासून.

1) विद्यार्थ्याला फक्त स्वत: च्याच अनिवार्य सहा विषयांच्या (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी करता येईल.त्यासाठी विद्यार्थ्याने स्वतः किंवा शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून (website) संबंधित विभागीय मंडळाकडे अर्ज करणे आवश्यक राहील.विद्यार्थ्यास तोंडी /प्रात्यक्षिक /श्रेणी/ अंतर्गत मूल्यमापन/प्रकल्प लेखन किंवा तत्सम उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींची मागणी करता येणार नाही.ज्या विषयांची उत्तरपत्रिका छायाप्रत आवश्यक आहे ते सर्व विषय एकाचवेळी ऑनलाईन भरणे आवश्यक आहे.एकदा अर्ज केल्यानंतर पुन्हा अर्ज करता येणार नाही.

2) परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून विहित नमुन्यात अर्ज करता येईल.अर्ज करण्याचा अंतिम दिनांक प्रत्येक परीक्षेच्या निकालाच्या दिवशी जाहीर करण्यात येईल.

3) छायाप्रत मिळण्यासाठी केलेल्या अर्जातील माहिती पूर्णपणे भरलेली असावी तसेच विहित शुल्क न भरल्यास उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती देण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

4) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी प्रती विषयास रु.४००/-इतके शुल्क ऑनलाईन पद्धतीने (Debit card/Credit card /UPI/Net Banking) भरता येईल.व भरणा केलेले शुल्क नापरतावा असेल.तथापि, उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यापूर्वी करण्यात येणाऱ्या गुणपडताळणीत विद्यार्थांच्या गुणात/ निकालात बदल झाल्यास उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी भरलेले शुल्क परत दिले जाणार नाही.

5) उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती देण्यापूर्वी त्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी केली जाते.गुणपडताळणी केल्यानंतर त्यावर होणारा निर्णय अंतिम असेल व तो विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.अशा प्रकरणी विद्यार्थ्यास मूळ गुणपत्रिका संबधित विभागीय मंडळाकडे जमा केल्यानंतरच त्यास सुधारित गुणपत्रिका देण्यात येईल.

6) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी अर्ज केला असल्यास त्याच विषयाच्या गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही व असा स्वतंत्र अर्ज गुणपडताळणी शुल्कासह केल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

7) मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे देण्यात येतील.उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती घेतल्यानंतर विद्यार्थ्याला पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती प्राप्त करून घेण्याची सूचना सबंधित विभागीय मंडळाकडून मिळाल्याच्या तारखेपासून कार्यालयीन कामकाजाच्या पाच दिवसात उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती घेऊन जाणे बंधनकारक असेल.याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.
i) रजिस्टर पोस्टाने मागणी केलेल्या प्रकरणात पोस्टासाठी सात दिवसाचा कालावधी सोडून कार्यालयीन कामकाजाच्या पाच दिवसात पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता येईल. ii) उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोहोच मिळाल्या पासून पाच दिवसात अर्ज करता येईल. iii) ईमेलद्वारे/संकेतस्थळावरून पाठवलेल्या प्रकरणी सॉफ्ट कॉपी विभागीय मंडळाकडून पाठविल्याच्या दिनांकापासून पाच दिवसात अर्ज करता येईल.

8) उत्तरपत्रिकांची छायाप्रत समक्ष नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall ticket) / फोटोसह असलेले कोणतेही ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील तसेच उत्तरपत्रिकांची छायाप्रत मिळाल्याची पोहोच देणे बंधनकारक राहील.

9) परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांना त्याच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यात येणार नाही.

10) संबधित विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकेची छायाप्रत अन्य कोणालाही दिल्यास अथवा प्रसिद्धी माध्यमाद्वारे प्रसिद्धी दिल्यास विद्यार्थी कारवाईस पात्र राहील.

11) उत्तीर्ण होऊ न शकलेल्या विद्यार्थ्याने मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती मिळण्याची वाट न पाहता पुढील परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी विहित मुदतीत माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत आवेदनपत्र संबधित विभागीय मंडळाकडे सादर करणे आवश्यक राहील.कोणत्याही परिस्थितीत निर्धारित मुदतीनंतर पुढील परीक्षेचे आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाही.

12) उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यापूर्वी होणाऱ्या गुणपडताळणीमध्ये गुण वाढीमुळे सवलतीचे गुण मिळण्यास विद्यार्थी पात्र ठरत असल्यास त्यास ते गुण देय असतील.

13) उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन/ यासाठी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी http://verification.mh-ssc.ac.in व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरून आलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील

14) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेनंतरच्या स्थलांतर पप्रमाणपत्रासाठी http://verification.mh-ssc.ac.in व इ. ११ वी तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेनंतरच्या प्रमाणपत्रासाठी http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरून आलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील

15) विध्यार्थ्याने उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन/स्थलांतर प्रमाणपत्र यासाठी करावयाच्या ऑनलाईन भरावयाची माहिती बिनचूक भरावी.अर्ज प्रणालीमध्ये SUBMIT केल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही

16) ऑनलाईन प्रणालीमध्ये विद्यार्थ्यास उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/ पुनर्मूल्यांकन/स्थलांतर प्रमाणपत्र या प्रत्येक बाबीसाठी फक्त एकदाच अर्ज करता येईल.त्यामुळे अर्ज भरण्यापूर्वी विषयाची संख्या निश्चित करूनच अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.कोणत्याही परिस्थितीत दुबार अर्ज स्विकारले जाणार नाहीत

17) उत्तरपत्रिका पुनर्मूल्यांकन करण्याकरिता अर्ज करतांना विषय शिक्षकांचा अभिप्राय PDF File स्वरूपात (File Size १५ MB पर्यंत) अपलोड करणे अनिवार्य आहे तसेच सदर अभिप्राय सुस्पष्ट असणे आवश्यक आहे

18) विध्यार्थ्यानी तांत्रिक बाबीसंदर्भात अडचणी/शंका असल्यास (support@msbshse.ac.in) या ई-मेल आयडी वर अथवा ०२०-२५७०५२०७, २५७०५२०८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

19) ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भात व्हिडीओ पाहण्यासाठी विध्यार्थ्यानी HELP या पर्यायाची निवड करावी.उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन/स्थलांतर प्रमाणपत्र या चारही प्रकारासाठी स्वतंत्र व्हिडीओ देण्यात आलेले आहेत

20) विद्यार्थ्याने ऑनलाईन प्रकीयेद्वारे केलेल्या अर्जाची सद्यस्थिती (status) संकेतस्थळावर पाहता येईल.आपल्या अर्जावरील प्रकिया पूर्ण झाल्यानंतरच आवश्यकता भासल्यास संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

©Maharashtra State Board Pune. All Rights Reserved.

# MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,PUNE.

Official website for HSC Verification of Marks/Photocopy of Answer Book/Revaluation of Answer Book/Migration Certificate

उत्तरपत्रिका गुणपडताळणी
VERIFICATION OF MARKS

उत्तरपत्रिका छायाप्रत
PHOTOCOPY OF ANSWER BOOK

उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन
REVALUATION OF ANSWER BOOK

तांत्रिक अडचणी साठी संपर्क
020-25705207,08
support@msbshse.ac.in

## सूचना/Instructions

### उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन (Revaluation) करण्यासाठी अटी/शर्ती व सूचना:

विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक सूचना, सूचना क्रमांक २३ पासून.

1) उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींची मागणी विहित कालावधीत करणारे विद्यार्थीच पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करू शकतील.विद्यार्थ्यास केवळ लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी मागणी करता येईल.तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी, अंतर्गत मूल्यमापन, प्रकल्प लेखन असलेले विषय किंवा तत्सम उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.

2) पुनर्मूल्यांकनासाठी विद्यार्थ्याने ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून (website) स्वतः किंवा शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विहित नमुन्यात संबंधित विभागीय मंडळाकडे अर्ज करणे आवश्यक असेल.ज्या विषयांचे पुनर्मूल्यांकन करावयाचे आहे (छायाप्रती घेतलेल्या) अशा सर्व विषयांसाठी एकाच वेळी अर्ज करणे आवश्यक आहे.एकदा अर्ज केल्यानंतर पुन्हा अर्ज करता येणार नाही.

3) उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींच्या शुल्काशिवाय विद्यार्थ्यास पुनर्मूल्यांकनासाठी प्रती विषयास रु.३००/-प्रमाणे वेगळे शुल्क ऑनलाईन पद्धतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking) भरणे अनिवार्य राहील.भरणा केलेले शुल्क नापरतावा असेल.

4) पुनर्मूल्यांकनासाठी जास्तीत जास्त सहा विषयांसाठी अर्ज करता येईल.

5) पुनर्मूल्यांकनासाठी उत्तरपत्रिकांची छायाप्रत मिळाल्याच्या तारखेपासून मंडळाने विहित केलेल्या मुदतीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे. i) रजिस्टर पोस्टाने मागणी केलेल्या प्रकरणात पोस्टाचा सात दिवसाचा कालावधी सोडून कार्यालयीन कामकाजाच्या पाच दिवसात पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता येईल. ii) उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोहोच मिळाल्या पासून पाच दिवसात अर्ज करता येईल. iii) ईमेलद्वारे /संकेतस्थळावरून पाठवलेल्या प्रकरणी सॉफ्ट कॉपी विभागीय मंडळाकडून पाठविल्याच्या दिनांकापासून पाच दिवसात अर्ज करता येईल. आपल्या माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील संबंधित विषय शिक्षकांकडून नमुना उत्तरे व गुणदान योजनेप्रमाणे उत्तरपत्रिकेची छायाप्रत तपासून घेऊन त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायसह व मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या सही शिक्क्यासह मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरील विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक असेल.विषय शिक्षकाकडे नमुना उत्तरे व गुणदान योजना उपलब्ध नसल्यास विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

6) पुनर्मूल्यांकन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत त्यांच्या माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील संबंधित विषय शिक्षकाकडून तपासून घ्यावयाची असल्यामुळे सदर कालावधीमध्ये शिक्षक उपलब्ध होण्याबाबत संबंधित मुख्याध्यापकांनी / प्राचार्यांनी आवश्यक खबरदारी घ्यावी.कोणताही इच्छुक विद्यार्थी पुनर्मूल्यांकनाच्या सुविधेपासून वंचित राहू नये म्हणून उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतींची तपासणी आपल्या माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील संबंधित विषय शिक्षकाकडून करून घेऊन विषय शिक्षकाचा अभिप्राय प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य यांची राहील.

7).इ.१०वी / इ.१२वी च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतिची तपासणी त्यांनी परीक्षेचे आवेदनपत्र सादर केलेल्या संपर्क माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकाकडून करून घेऊन त्यांच्याकडून अभिप्राय घेऊन अर्जसोबत सादर करणे अनिवार्य आहे.

8) ज्या विषयात दोन पेपर / भाग आहेत अशा विषयाच्या बाबतीत विद्यार्थ्यास दोन्ही पेपरच्या / भागाच्या उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतिची तपासणी आपल्या माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकाकडून करून घेऊन त्या दोन्ही पेपरच्या / भागाच्या उत्तरपत्रिकेबाबतच्या अभिप्रायासह पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करणे बंधनकारक असेल.केवळ एका पेपरच्या / भागाच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी विद्यार्थ्यास करता येणार नाही.

9) विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर त्यासोबत अ.क्र.६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विषय शिक्षकांच्या अभिप्रायाची प्रत मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या सही शिक्क्यासह स्कॅन करून अपलोड करावी मात्र उत्तरपत्रिकेची छायाप्रत स्कॅन करून अपलोड करू नये.

10) विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर त्यासोबत अ.क्र.६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विषय शिक्षकांच्या अभिप्रायाची प्रत मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या सही शिक्क्यासह स्कॅन करून अपलोड करावी मात्र उत्तरपत्रिकेची छायाप्रत स्कॅन करून अपलोड करू नये.

11) उत्तरपत्रिकेचे एकदा पुनर्मूल्यांकन केल्यानंतर सदर उत्तरपत्रिकेची पुन: श्च गुणपडताळणी, पुनर्मूल्यांकन किंवा छायांकित प्रतीची मागणी विद्यार्थ्यास करता येणार नाही.

12) पुनर्मूल्यांकनात गुणात बदल झालेल्या प्रकरणी फक्त बदल झालेल्या विषयासाठी विद्यार्थ्याने भरलेले पुनर्मूल्यांकन शुल्क परत दिले जाईल.

13) वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या (उदा.रिकाम्या जागा भरा, जोड्या लावा, योग्य पर्याय निवडा, चूक की बरोबर लिहा इ.प्रकारचे प्रश्न) बाबतीत पुनर्मूल्यांकनानंतर त्यामध्ये होणारी गुणांची वाढ किंवा घट जशीच्या तशी ग्राह्य धरण्यात येईल.

14) वस्तुनिष्ठ प्रश्न सोडून इतर सर्व प्रश्नांसाठी एकत्रितरीत्या त्या विषयामध्ये पूर्वी मिळालेल्या गुणांच्या (मूळ गुणांच्या) किमान पाच टक्के कमी किंवा जास्त गुण पुनर्मूल्यांकनात झाल्यास सुधारित गुण ग्राह्य धरण्यात येतील.पाच टक्क्यांपेक्षा कमी गुण बदल प्रकरणी गुणात कोणताही बदल न करता विद्यार्थ्यास 'नो चेंज ' (No change) असे कळविण्यात येईल व अशा प्रकरणी कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही.मात्र संबंधित विषयाच्या लेखी परीक्षेत ९०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त झालेले आहेत अशा विषयांच्या पुनर्मूल्यांकनात गुणवाढ मंजूर करण्यासाठी ५% गुण वाढतील / कमी होतील ही अट शिथिल करून जितके गुण वाढतील / घटतील ते विद्यार्थ्यास देण्यात येतील.

15) उत्तीर्ण होऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुनर्मूल्यांकनानंतर त्याच्यामूळ निकालात बदल होत नसल्यास तसेच विषयात उत्तीर्ण होत नसल्यास पाच टक्के किंवा अधिक गुण बदल प्रकरणी त्याचा मूळ निकाल व संपादणूक कायम ठेऊन त्यास 'नो चेंज ' (No change) असे कळविण्यात येईल व अशा प्रकरणी कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही.

16) उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन केल्यानंतर होणारा निर्णय अंतिम राहील व तो विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल.त्यानुसार पुनर्मूल्यांकनानंतर संबंधित विद्यार्थ्यांच्या विषयाची मूळ संपादणूक आपोआप रद्द होऊन सुधारित संपादणूक स्वीकारणे विद्यार्थ्यास बंधनकारक राहील.

17) पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्याच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधित विद्यार्थ्यास व संबंधित माध्यमिक शाळेस / उच्च माध्यमिक शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास कळविण्यात येईल.त्यानुसार विद्यार्थ्याचे मूळ गुणपत्रक विभागीय मंडळाकडे जमा केल्यानंतर त्यास सुधारित गुणपत्रक देण्यात येईल.

18) एखाद्या विषयात सवलतीचे गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण झालेला असेल व अशा विद्यार्थ्याने सवलतीचे गुण मिळालेल्या विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केला व पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्याचे गुण अधिक अथवा कमी झाल्यास व त्यामुळे विद्यार्थी सवलतीच्या गुणांसाठी अपात्र ठरल्यास अशा प्रकरणी संबंधित विद्यार्थ्याच्या उत्तीर्ण या निकालात बदल करण्यात येईल.

19) पुनर्मूल्यांकनातील गुणवाढीमुळे सवलतीचे गुण मिळण्यास पात्र ठरत असल्यास त्यास ते गुण देय असतील.

20) पुनर्मूल्यांकनाचा ऑनलाईन अर्ज, त्यासोबत सादर करावयाचे विषय शिक्षकांचे अभिप्राय मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या सही शिक्क्यासह तसेच आवश्यक शुल्क मंडळाने निर्धारित केलेल्या मुदतीमध्ये संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन जमा करणे आवश्यक असेल.

21) उत्तीर्ण होऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाच्या निकालाची वाट न पाहता पुढील परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी विहित मुदतीत परीक्षेचे आवेदनपत्र संबंधित विभागीय मंडळाकडे माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळेमार्फत / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सादर करणे आवश्यक आहे.निर्धारित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत पुढील परीक्षेचे आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.

22) एखाद्या उत्तीर्ण होऊ न शकलेल्या विद्यार्थ्याने पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल व त्याच वेळी त्याने पुढील परीक्षेसाठी आवेदनपत्र भरले असेल आणि पुनर्मूल्यांकनानंतर जर त्याचा परीक्षेचा निकाल बदलला तर त्याने भरणा केलेले संपूर्ण शुल्क(परीक्षा शुल्क व इतर) त्याला परतावा म्हणून देण्यात येईल.

23) उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन/ यासाठी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी http://verification.mh-ssc.ac.in व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरून आलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील

24) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेनंतरच्या स्थलांतर पप्रमाणपत्रासाठी http://verification.mh-ssc.ac.in व इ. ११ वी तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेनंतरच्या प्रमाणपत्रासाठी http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरून आलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील

25) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेनंतरच्या स्थलांतर पप्रमाणपत्रासाठी http://verification.mh-ssc.ac.in व इ. ११ वी तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेनंतरच्या प्रमाणपत्रासाठी http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरून आलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील

26) विध्यार्थ्याने उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन/स्थलांतर प्रमाणपत्र यासाठी करावयाच्या ऑनलाईन भरावयाची माहिती बिनचूक भरावी.अर्ज प्रणालीमध्ये SUBMIT केल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही

27) ऑनलाईन प्रणालीमध्ये विद्यार्थ्यास उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन/स्थलांतर प्रमाणपत्र या प्रत्येक बाबीसाठी फक्त एकदाच अर्ज करता येईल.त्यामुळे अर्ज भरण्यापूर्वी विषयाची संख्या निश्चित करूनच अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.कोणत्याही परिस्थितीत दुबार अर्ज स्विकारले जाणार नाहीत

28) उत्तरपत्रिका पुनर्मूल्यांकन करण्याकरिता अर्ज करतांना विषय शिक्षकांचा अभिप्राय PDF File स्वरूपात (File Size १५ MB पर्यंत) अपलोड करणे अनिवार्य आहे तसेच सदर अभिप्राय सुस्पष्ट असणे आवश्यक आहे

29) विध्यार्थ्यांनी तांत्रिक बाबीसंदर्भात अडचणी/शंका असल्यास (support@msbshse.ac.in) या ई-मेल आयडी वर अथवा ०२०-२५७०५२०७, २५७०५२०८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

30) ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भात व्हिडीओ पाहण्यासाठी विध्यार्थ्यांनी HELP या पर्यायाची निवड करावी.उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन/स्थलांतर प्रमाणपत्र या चारही प्रकारासाठी स्वतंत्र व्हिडीओ देण्यात आलेले आहेत

31) विद्यार्थ्यांने ऑनलाईन प्रकीयेद्वारे केलेल्या अर्जाची सद्यस्थिती (status) संकेतस्थळावर पाहता येईल.आपल्या अर्जावरील प्रकिया पूर्ण झाल्यानंतरच आवश्यकता भासल्यास संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

©Maharashtra State Board Pune. All Rights Reserved.

Bhamburda, Shivajinagar, Agarkar marg, Shivajinagar Pune 411005(M.S.)